श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट आणि श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट
श्रीक्षेत्र डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

जून २०२४ | वर्ष – १२ अंक – ६ | विशेषांक | पाने ३२ | Regn.No. - MAHMAR/2022/86035

## श्रीक्षेत्र डेरवण येथे कार्यरत श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट आणि श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या कार्याचा संक्षिप्त वार्षिक आढावा (सन २०२३–२४)




श्री विठ्ठल गणेश जोशी तथा श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी महाराज



श्री विठ्ठल गणेश जोशी तथा श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी महाराज आणि भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर



श्री. अशोक रघुनाथ जोशी तथा श्रीकाकामहाराज
प्रमुख विश्वस्त



श्री. विकास कमलाकरपंत वालावलकर
कार्यकारी विश्वस्त

# श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर



श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर यांचा जन्म १८९९ सालचा. जन्मगाव तेरसे-बांबर्डे, ता. कुडाळ, जि. रत्नागिरी (आता जि. सिंधुदुर्ग). मनात ऐन तारुण्यात वैराग्य निर्माण झाले आणि श्रीस्वामी समर्थांच्या दृष्टान्तानुसार ते सावर्डे (ता. चिपळूण) येथे श्रीसंत दिगंबरबाबा वहाळकर यांचे शिष्यत्व पत्करून त्यांची आणि समाजाची सेवा करीत संन्यस्तवृत्तीने आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत सावर्डे येथे राहिले. श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती सीतारामबुवांना बंधुवत मानीत असत. त्यांचा अधिकार ओळखून, त्यांचे कार्य लक्षात घेऊन श्रीमहाराजांनी श्री सीतारामबुवांच्या महानिर्वाणानंतर (माघ शु. १, शक १८९०; शनिवार, दि. १८.१.१९६९) श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट स्थापन केला.

श्रीसंत सीतारामबुवांनी आजन्म पंचक्रोशीतील लोकांची अनेक प्रकारे सेवा केली. ट्रस्टने त्यांचे कार्य हे एक व्रत म्हणून अंगीकारून समाजातील गोरगरिबांचे जीवन सुखी व्हावे, त्यांची आर्थिक प्रगती व्हावी, त्यांचा सामाजिक स्तर वाढावा, त्यांना शिक्षण-आरोग्य आदी सेवा मिळाव्यात, ते स्वावलंबी व्हावेत, त्यांना उत्तम सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मार्गदर्शन मिळावे यासाठी अनेकविध कार्यक्रम सुरू केले. यातील बहुतेक कार्यक्रम ट्रस्टने स्वत:च्या बळावर सुरू केले. आज सुमारे ५५ वर्षे हे कार्यक्रम अव्याहत सुरू आहेत आणि त्याची व्याप्ती वाढत आहे. सेवाभावी स्वयंसेवकांच्या बळावर हे कार्य असेच पुढे सुरू राहणार आहे. गत पन्नास-पंचावन्न वर्षांत ट्रस्टने केलेल्या कामांमुळे, सुरुवातीला ज्याचे स्वरूप पायाभरणीसारखे होते, आता डेरवण परिसरामध्ये लक्षणीय बदल जाणवू लागला आहे. आजही ते कार्य निष्ठेने पुढे नेण्यात येत आहे. त्याचाच संक्षिप्त आढावा पुढे सादर करण्यात येत आहे..



*श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर समाधिमंदिर, श्रीक्षेत्र डेरवण*



*श्रीस्वामी समर्थ-श्रीराममंदिर, श्रीक्षेत्र डेरवण*

# श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट – सवलतीच्या दरामध्ये तेल, साखर यांचे वाटप



गणपतीसणानिमित्त तेल, साखर वाटप



श्रावणमासानिमित्त तेल, साखर वाटप

## दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत ट्रस्टच्या ७५० ओळखपत्रधारक कुटुंबांना खालील सणांनिमित्त सवलतीच्या दरामध्ये तेल, साखर यांचे वाटप

| | | | |
|---|---|---|---|
| १९ ऑगस्ट २०२३ (श्रावण) – | ७५० लिटर तेल | ग्राहकांकडून विक्रीद्वारे जमा झालेली रक्कम – | ९३,७५०/– रुपये |
| | १५०० किलो साखर | संस्थेने केलेला खर्च – | १,३९,७५५/– रुपये |
| १४ सप्टेंबर २०२३ (श्रीगणेश चतुर्थी) – | ७५० लिटर तेल | ग्राहकांकडून विक्रीद्वारे जमा झालेली रक्कम – | ९३,७५०/– रुपये |
| | १५०० किलो साखर | संस्थेने केलेला खर्च – | १,४१,२५५/– रुपये |
| ०८ नोव्हेंबर २०२३ (दिवाळी)– | ७५० लिटर तेल | ग्राहकांकडून विक्रीद्वारे जमा झालेली रक्कम – | १,६५,०००/–रुपये |
| | १५०० किलो साखर | संस्थेने केलेला खर्च – | २,१०,०००/–रुपये |
| | ७५० नग साबणवड्या | | |
| आणि | ५० खोबरेल तेल बाटल्या | | |
| २० मार्च २०२४ (शिवजयंती) – | ७५० लिटर तेल | ग्राहकांकडून विक्रीद्वारे जमा झालेली रक्कम – | १,१२,५००/–रुपये |
| | १५०० किलो साखर | संस्थेने केलेला खर्च – | १,४०,२५०/–रुपये |

**दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत**

**ट्रस्टने तेल–साखर वाटपासाठी केलेला खर्च : रु. ६,३१,२६०/–**

**तेल–साखर विक्रीतून जमा झालेली रक्कम : रु. ४,६५,०००/–**

**ट्रस्टने लोकांना केलेली मदत : रु. १,६६,२६०/–**



दिवाळीनिमित्त तेल, साखर वाटप



दिवाळीनिमित्त खोबरेल तेल, साबण वाटप

# श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट - साडी व शर्ट वाटप (सन २०२३-२४)



*शिवजयंतीनिमित्त शर्ट वाटप*



*दिवाळीनिमित्त साडी वाटप*

श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्टतर्फे विविध सण आणि उत्सवांच्या निमित्ताने परिसरातील ग्रामस्थ स्त्री-पुरुषांना साड्या आणि शर्ट यांचे विनामूल्य वाटप करण्यात येते. त्यामुळे त्यांच्यावर येणारा प्रपंचाचा वार्षिक खर्चाचा भार हलका होतो.

## दि. १३ सप्टेंबर २०२३- चक्रीभजन

लाभार्थी ग्रामस्थांची गावे - डेरवण, सावर्डे, अबीट, कोंडमाळा, कुडप, हडकणी, काजरकोंड, मांडकी, डोक्रवली

| | | | |
|---|---|---|---|
| सहावारी साडी - | ६८० नग | प्रत्येकी रु. ४००/- | संस्थेने केलेला एकूण खर्च रु. २,७२,०००/- |
| नऊवारी साडी - | २३५ नग | प्रत्येकी रु. ३८०/- | संस्थेने केलेला एकूण खर्च रु. ८९,३००/- |
| शर्ट - | १७० नग | प्रत्येकी रु. १४००/- | संस्थेने केलेला एकूण खर्च रु.२,३८,०००/- |
| | | | **एकूण रु. ५,९९,३००/-** |

## दि. २६ ऑक्टोबर २०२३ (दिवाळी )

लाभार्थी ग्रामस्थांची गावे - डेरवण, सावर्डे, अबीट, कोंडमाळा, कुडप, हडकणी, काजरकोंड, मांडकी, तळसर, वहाळ, दहिवली

| | | | |
|---|---|---|---|
| सहावारी साडी - | ८३२ नग | प्रत्येकी रु. ४००/- | संस्थेने केलेला एकूण खर्च रु.३,३२,८००/- |
| नऊवारी साडी - | ३२२ नग | प्रत्येकी रु. ३८०/- | संस्थेने केलेला एकूण खर्च रु.१,२२,३६०/- |
| शर्ट - | ५२ नग | प्रत्येकी रु. १४००/- | संस्थेने केलेला एकूण खर्च रु. ७२,८००/- |
| | | | **एकूण रु. ५,२७,९६०/-** |

## दि. २७ फेब्रुवारी २०२३ - श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर पुण्यतिथी उत्सव

लाभार्थी ग्रामस्थांची गावे - डेरवणगाव, सावर्डे, अबीटगाव, कोंडमाळा, कुडपगाव, हडकणीगाव, काजरकोंड, मांडकी, असुर्डे, आगवे, कोसबी मुंडे

| | | | |
|---|---|---|---|
| नऊवारी साडी - | २८० नग | प्रत्येकी रु. ३८०/- | संस्थेने केलेला एकूण खर्च रु. १,०६,४००/- |
| सहावारी साडी - | ९८० नग | प्रत्येकी रु. ४००/- | संस्थेने केलेला एकूण खर्च रु. ३,९२,०००/- |
| शर्ट - | ३६० नग | प्रत्येकी रु. १४००/- | संस्थेने केलेला एकूण खर्च रु. ५,०४,०००/- |
| | | | **एकूण रु. १०,०२,४०० /-** |

# श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट - साडी व शर्ट वाटप (सन २०२३-२४)



श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर पुण्यतिथीनिमित्त शर्ट वाटप



साडीवाटपाला महिलांचा मिळणारा उत्साही प्रतिसाद

## दि. २८ मार्च २०२४ - शिवजयंती उत्सव

लाभार्थी ग्रामस्थांची गावे - डेरवण, सावर्डे, अबीटगाव, कोंडमाळा, कुडपगाव, हडकणी, काजरकोंड, मांडकी, असुर्डे, आगवे, कोसबीमुंडे धनगरवाडी, डोक्रवली, पालवण, दहिवली, निवळी

| | | | |
|---|---|---|---|
| सहावारी साडी - | ८३० नग | प्रत्येकी रु. ४००/- | संस्थेने केलेला एकूण खर्च रु. ३,३२,०००/- |
| नऊवारी साडी - | २६० नग | प्रत्येकी रु. ३८०/- | संस्थेने केलेला एकूण खर्च रु. ९८,८००/- |
| शर्ट - | ६५८ नग | प्रत्येकी रु. १४०० | संस्थेने केलेला एकूण खर्च रु. ९,२१,२००/- |
| | | | **एकूण रु. १३,५२,०००/-** |

**वर्षभरात साड्या आणि शर्टवाटपासाठी संस्थेने केलेला एकूण खर्च**

| | | | |
|---|---|---|---|
| **सहावारी साडी -** | **३३२२ नग** | **प्रत्येकी रु. ४००/-** | **संस्थेने केलेला एकूण खर्च रु. १३,२८,८००/-** |
| **नऊवारी साडी -** | **१०९७ नग** | **प्रत्येकी रु. ३८०/-** | **संस्थेने केलेला एकूण खर्च रु. ४,१६,८६०/-** |
| **शर्ट -** | **१२४० नग** | **प्रत्येकी रु. १४००/-** | **संस्थेने केलेला एकूण खर्च रु. १७,३६,०००/-** |

**एकूण रु.३४,८१,६६०/-**



शिवजयंतीनिमित्त साडीवाटप




शिवजयंतीनिमित्त साडीवाटप

# श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्टतर्फे टंचाईग्रस्त गावांना मोफत पाणीपुरवठा



*सावर्डे बौद्धवाडी येथे टॅन्करद्वारे मोफत पाणीपुरवठा*




*गणेशवाडी, डेरवण येथे टॅन्करद्वारे मोफत पाणीपुरवठा*

पंचक्रोशीतील पाण्याची समस्या लक्षात घेऊन ट्रस्टतर्फे, ट्रस्टच्या मालकीच्या तसेच भाड्याने आणलेल्या टॅन्कर्सद्वारे टंचाईच्या काळात दररोज १,५०,००० लिटर पाणी आंबतखोल, दहिवली, बहादूरशेख नाका, खेर्डी येथून उचलून खालील गावांना पुरविण्यात आले.

१. डेरवणगाव - फौजदारवाडी, धनगरवाडी, सुतारवाडी, चिनोळकरवाडी, चव्हाणवाडी, बौद्धवाडी, गवळवाडी, गुरववाडी गणेशवाडी

२. सावर्डेगाव - खोतवाडी, चव्हाणवाडी, भुवडवाडी, बौद्धवाडी, होडेवाडी, गुरववाडी, फौजदारवाडी, टेटांबेवाडी, खेराडेवाडी,

३. कोंडमळा - पेंढारवाडी, नारळीचीवाडी, वरचीवाडी, बौद्धवाडी, कानसेवाडी

४. दहिवली - राम वसाहत क्रमांक १, राम वसाहत क्रमांक २, भुवडवाडी क्रमांक १, भुवडवाडी क्रमांक २

५. कुडप - बौद्धवाडी, पलीकडचीवाडी, मधलीवाडी, मोकासवाडी, वानवडी, धनगरवाडी, कुंभारवाडी

६. काजरकोंड ७. बागवेवाडी ८. वहाळफाटा - मधलीवाडी, हुमणेवाडी, कोष्टीवाडी, वरचीवाडी

| क्रमांक | तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | डिझेल खरेदी | २६,७३,२२८.२९ |
| २ | भाड्याने आणलेल्या ५ टॅन्कर्सचे भाडे | ३२,०३,२०५.०० |
| ३ | टॅन्कर चालकांच्या जेवण-खाणाचा खर्च<br>(१ वेळ न्याहरी, २ वेळा जेवण आणि ५ वेळा चहा)<br>८ चालक, २१३ दिवस, प्रत्येकी रु. २०० प्रमाणे | ३,४०,८००.०० |
| | **मोफत पाणीपुरवठ्यासाठी ट्रस्टने केलेला एकूण खर्च** | **६२,१७,२३३.२९** |




*मारुतीची चव्हाणवाडी येथे टॅन्करद्वारे मोफत पाणीपुरवठा*



*सावर्डे येथे टॅन्करद्वारे मोफत पाणीपुरवठा*

# श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट - मोफत वह्या वाटप (सन २०२३-२४)



*गुणदे, खेड येथील शाळेत मोफत १०० पानी वह्यांचे वाटप*



*सद्गुरू श्रीकाडसिद्धेश्वर विद्यालय, गुणदे*

| अनुक्रम | शाळेचे नाव व पत्ता | संस्थेने मोफत दिलेल्या वह्या (१०० पानी) |
|---|---|---|
| १ | शावजीराव लक्ष्मणराव निकम शाळा, कोसबी, फुरुस. | ७५५ |
| २ | न्यू इंग्लिश ज्युनियर कॉलेज, खेर्डी सती. | ८२९१ |
| ३ | मिलिंद हायस्कूल, रामपूर, चिपळूण. | ११०६ |
| ४ | कै. शिवरामशेट लांजेकर विद्यालय, कळमुंडी. | ६३३ |
| ५ | सद्गुरू काडसिद्धेश्वर विद्यालय, गुणदे. | २०९४ |
| ६ | गुरुकुल विद्यामंदिर, गुणदे. | २६७ |
| ७ | न्यू इंग्लिश स्कूल, वेलदूर, गुहागर. | ५४० |
| ८ | श्री शिवशंकर माध्यमिक विद्यालय, कुळवंडी. | ७९४ |
| ९ | मोहन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, आकले. | १६०८ |
| १० | माध्यमिक महिला विद्यालय पाग, चिपळूण. | ४७२ |
| ११ | नूतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, डुगवे, शिरवली. | १६६८ |
| १२ | प्रा. केंद्रशाळा, मिरवणे. | २७० |
| १३ | आदर्श केंद्र शाळा, चिखली नं. १, गुहागर. | ३४९ |
| १४ | पालपेणे शाळा नं. १, गुहागर. | ४१४ |
| १५ | मार्गताम्हाणे शाळा नं. १, चिपळूण. | ६० |
| १६ | जि.प. प्रा. शाळा, जांबसूत नं. १ | ५० |
| १७ | जि.प. प्रा. शाळा, नं. २, वेळंबे, घाडेवाडी. | १४६ |
| १८ | सरस्वती विद्यामंदिर, जामसुत. | १०३७ |
| १९ | न्यू इंग्लिश स्कूल, खांडोत्री, आबीटगाव. | ३०८ |
| २० | भाइशा घोसाळकर शाळा, कडवई. | ११९४ |

| | | |
|---|---|---|
| २१ | जि.प. शाळा, कडवई, तांबटवाडी. | ५० |
| २२ | जि.प. शाळा, गुडे-डुगवे. | १३० |
| २३ | जि.प. शाळा, शिरवली, गोळवाडी. | ३६ |
| २४ | जि.प. शाळा, निवे बु.नं. १, संगमेश्वर. | १३० |
| २५ | जि.प. प्रा. शाळा, निवे बु. जोशीवाडी. | ३० |
| २६ | न्यू इंग्लिश स्कूल, वेळणेश्वर, गुहागर. | ५०० |
| २७ | न्यू इंग्लिश स्कूल, कळंबट, चिपळूण. | ५०० |
| २८ | शिवाजीराव ऊर्फ बाबासाहेब सुर्वे माध्यमिक विद्यालय, चिपळूण. | १३६५ |
| २९ | माध्यमिक आश्रम शाळा, जावडे. | २४५ |
| ३० | ह.भ.प. आ. ब. सावंत माध्यमिक विद्यालय, तोंडली. | १००८ |
| ३१ | न्यू इंग्लिश स्कूल, नांदगाव. | २६४ |
| ३२ | गोविंदराव निकम माध्यमिक विद्यालय, सावर्डे भागशाळा, खरवते. | ५१५ |
| ३३ | जि.प. शाळा नं १, आगवे. | २५२ |
| ३४ | जि.प. पू. प्रा. केंद्रशाळा, डेरवण नं १. | १३२ |
| ३५ | न्यू इंग्लिश स्कूल, पोफळी. | १२० |
| ३६ | जि.प. विद्यामंदिर, आंबर्डे. | ३५० |
| ३७ | जि.प. पू. प्रा. शाळा, शिरंबे नं १. | ८१ |
| ३८ | सुमन विद्यालय, टेरव. | ५०५ |
| ३९ | न्यू इंग्लिश स्कूल, पाग, चिपळूण. | ३६० |
| ४० | जि.प. शाळा, हडकणी. | ११२ |
| ४१ | जि.प. शाळा, कोसबी, जोगवाडी. | १४ |
| ४२ | जि.प. शाळा, काजरकोंड. | ४४ |
| ४३ | माखजन इंग्लिश स्कूल, माखजन, | ८०० |
| ४४ | जि.प. शाळा, ओम्बळी नं १. | ५८५ |
| ४५ | पांडुरंग गोविंद महाडिक विद्यालय, धामापूर. | १६० |
| ४६ | श्री. राजाराम राघोजीराव शिंदे माध्यमिक विद्यालय, ओम्बळी, नांदिवसे. | ५६० |
| ४७ | न्यू इंग्लिश स्कूल, खडपोली. | ९२ |
| | मोफत वाटलेल्या एकूण वह्या | ३१,००० |
| | वह्यावाटपासाठी संस्थेने केलेला एकूण खर्च | रु. ४,००,९८३/- |

# श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्टच्या मालकीचे गोधन (२०२३ - २०२४)



*संस्थेच्या मालकीचे गोधन*



*संस्थेच्या मालकीचे गोधन*

## ट्रस्टच्या मालकीचे गोधन

| अनुक्रम | गुरे | संख्या |
|---|---|---|
| १ | दुभत्या गाई | १९ |
| २ | गाई | १२ |
| ३ | वृद्ध गाई | ३ |
| ४ | बैल | ३९ |
| ५ | वृद्ध बैल | ३ |
| ६ | दुधावरच्या पाड्या | १६ |
| ७ | दुधावरचे पाडे | ३ |
| ८ | पाडे | ७ |
| | **एकूण गुरे** | **१०२** |

## गोधनाचे वाटप २०२३ -२४

| क्र. | नाव | पाडे | पाड्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. नितेश करंजकर, आमणस | | २ |
| २ | श्री. विजय मांडवकर, ढोक्रवली | | ३ |
| ३ | श्री. प्रशांत महाडीक, ढोक्रवली | २ | १ |
| ४ | श्री. वैभव लाड, ढाकमोली | २ | |
| ५ | श्री. सिद्धेश लाड, ढाकमोली | | २ |
| ६ | श्री. कुणाल महाडीक, पालवण | १ | २ |
| ७ | श्री. दत्ता गुजर, कोसबी | | २ |
| ८ | श्री. ओंकार भुवड, डेरवण | | १ |
| ९ | श्री. धीरज गुजर, कोसबी | | १ |
| १० | श्री. आबा सावंत, तोंडली-पिलवली | | २ |
| ११ | श्री. अमर राजेशिर्के, कुडप | १ | |



*श्री. नितेश करंजकर (आमणस) संस्थेने मोफत दिलेल्या वासरासोबत*



*श्री. आबा सावंत (तोंडली, पिलवली) संस्थेने मोफत दिलेल्या वासरासोबत*

# श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट - आर्थिक आणि वस्तुरूपाने मदत(सन २०२३-२४)



*डेरवण ग्रामपंचायत इमारत*



*वाघजाई मंदिर, पाचांबे*

| क्रमांक | दिनांक | ठिकाण | अर्जदार | संस्थेने केलेली मदत | खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९.०४.२०२३ | चव्हाणवाडी, डेरवण | श्री. अनंत चव्हाण | घरासाठी ५० पोती सिमेंट दिले. | १९,०००/- |
| २ | २७.०५.२०२३ | ग्रामपंचायत, डेरवण | सौ. अक्षता मुंडेकर (सरपंच, डेरवण) | डेरवण ग्रामपंचायतीचा पहिला मजला पूर्णतः बांधून दिला तसेच पूर्ण इमारतीला रंगकाम करून दिले व ग्रामपंचायतीवरती पत्राशेड करून दिली. | ८,८८,८३०/- |
| ३ | २७.०५.२०२३ | डेरवण गाव नदी स्वच्छता | | पोकलेन व जे.सी.बी.च्या साहाय्याने डेरवण धरणापासून गावातील नदी स्वच्छ केली. | ५,१५,५२५/- |
| ४ | ०६.०६.२०२३ | जि.प. डेरवण शाळा क्र. १ | श्री. कोलते सर<br>श्री. अविनाश शेंबेकर | सभागृहावरील पत्राशेड करून दिली. | १,२१,७९१/- |
| ५ | १५.०६.२०२३ | केदारनाथ मंदिर, डेरवण | श्री. महादेव गुजर<br>श्री. अशोक गुजर<br>श्री. किशोर राजेशिर्के श्री. दिलीप राजेशिर्के | ५०० पोती सिमेंट, १५,००० विटा केदारनाथ मंदिर बांधकामासाठी दिल्या. | ३,३६,०००/- |
| ६ | १.६.२०२३ | केदारनाथ मंदिर, डेरवण | श्री. महादेव गुजर<br>श्री. दिलीप राजेशिर्के | १२,००० विटा केदारनाथ मंदिर बांधकामासाठी दिल्या. | १,२६,०००/- |
| ६ | १९.०४.२०२३ | डेरवण | श्रीमती अनिता चव्हाण | २५ पोती सिमेंट | ९,०००/- |

# श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट -आर्थिक आणि वस्तुरूपाने मदत(सन २०२३-२४)



विठ्ठल-रखुमाई मंदिर चव्हाणवाडी



नदी सफाई

| क्रमांक | दिनांक | ठिकाण | अर्जदार | संस्थेने केलेली मदत | खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ७ | ०२.०७.२०२३ | कोसबी | श्री. भिकाजी बांद्रे | १० पोती सिमेंट | ३६००/- |
| ८ | १५.०७.२०२३ | डेरवण | श्रीमती अनिता चव्हाण | २५ पोती सिमेंट | ९,०००/- |
| ९ | २४.०७.२०२३ | काजरकोंड | अक्षता जोयशी | १० पोती सिमेंट | ३६००/- |
| १० | २४.०१.२०२४ | डेरवण, हरीनाम सप्ताह | श्री. संतोष चव्हाण<br>श्री. तात्या गुरव | २५ कि. तुरडाळ,<br>५० कि. तांदूळ,<br>तेल डबा १ | ११,१००/- |
| ११ | १२.०१.२०२४ | डेरवण शाळा नं १ | श्री. अविनाश शेंबेकर | ४०० पेन | ४०००/- |
| १२ | ०३.०२.२०२४ | डेरवण, सुतारवाडी शाळा | श्री. सुभाष जाधव<br>इयत्ता १ ते इयत्ता ४ | २ वर्ग पूर्ण रंगवून दिले | ५२,४९०/- |
| १३ | ०६.०२.२०२४ | डेरवण शाळा नं १ | श्री. प्रकाश कोलते<br>इयत्ता २, इयत्ता ४,<br>इयत्ता ६, इयत्ता ७. | ४ वर्ग पूर्ण रंगवून दिले | ७२,०००/- |
| १४ | ०६.०२.२०२४ | हडकणी, गावंडवाडी | प्रगती मालप | १० पोती सिमेंट | ३६००/- |
| १५ | ०७.०२.२०२४ | हडकणी, गावंडवाडी | श्री.धोंडू भुवड | १० पोती सिमेंट | ३६००/- |

| क्रमांक | दिनांक | ठिकाण | अर्जदार | संस्थेने केलेली मदत | खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १६ | १६.०२.२०२४ | केदारनाथ मंदिर, डेरवण | श्री. महादेव गुजर, श्री. दिलीप राजेशिर्के | १०० पोती सिमेंट | ३६०००/- |
| १७ | १२.०३.२०२४ | डेरवण, चव्हाणवाडी | राजश्री गुरव | १० पोती सिमेंट | ३६००/- |
| १८ | १४.०३.२०२४ | कोतवडे, श्री महालक्ष्मी मंदिर | श्री. चंद्रकांत सुर्वे श्री. विनायक सहस्रबुद्धे | १०० पोती सिमेंट | ३६०००/- |
| १९ | १५.०३.२०२४ | डेरवण, गवळवाडी | सुलोचना चव्हाण | १० पोती सिमेंट | ३६००/- |
| २० | १५.०३.२०२४ | हडकणी, गावंडवाडी | महेश्वरी मालप | १० पोती सिमेंट | ३६००/- |
| २१ | १६.०३.२०२४ | डेरवण | लक्ष्मी महाडिक | १० पोती सिमेंट | ३६००/- |
| २२ | १७.०३.२०२४ | कोंडमळा | दर्शना कानसे | १० पोती सिमेंट | ३६००/- |
| २३ | १७.०३.२०२४ | कोंडमळा | राजश्री कानसे | १० पोती सिमेंट | ३६००/- |
| २४ | १९.०३.२०२४ | हडकणी, गावंडवाडी | सुषमा मालप | १० पोती सिमेंट | ३६००/- |
| २५ | १९.०३.२०२४ | कोंडमळा | पूर्वा कानसे | १० पोती सिमेंट | ३६००/- |

**एकूण खर्च - रुपये २२, ७०, ९३६/-**



*केदारनाथ मंदिर, डेरवण*



*जि.प. शाळा क्र. १, डेरवण - पत्र्याची शेड*

## श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट - स्वस्त दरात शेती उत्पादनांची विक्री (२०२३-२४)



*संस्थेची भाजीपाला लागवड*



*संस्थेची पपई लागवड*

✻ ट्रस्टच्या शेतजमिनीमध्ये सेन्द्रिय खतांचा वापर करून पिकवलेला १०६६ किलो तांदूळ लोकांना स्वस्त दरात देण्यात आला. १०६६ कि. X ३३ रु. प्रतिकिलो

**= एकूण विक्री रु. ३५,१७८/-**

✻ ट्रस्टच्या शेतजमिनीमध्ये सेन्द्रिय खतांचा वापर करून पिकवलेल्या फळभाज्या, पालेभाज्या तसेच कुळीथ, चवळी, पावटा अशी कडधान्ये आणि आंबा, फणस, काजू, चिकू, पपई, कलिंगड, केळी, जांभूळ अशी विविध प्रकारची फळे लोकांना स्वस्त दरात देण्यात आली. **एकूण विक्री - रु. २,२०,४४५/-**

## परिसरातील गावांतून पेंढा व गवत खरेदी करण्यात आले (२०२३-२४)

✻ गरजू शेतकऱ्यांकडून पेंढा व गवत खरेदी करून ज्यांना त्याची आवश्यकता आहे त्यांना तो देण्यात येतो

पेंढा खरेदी -✻ डेरवणगाव - फौजदारवाडी, गुरववाडी, तटकरीवाडी, गवळवाडी, चव्हाणवाडी, खालचीवाडी, गणेशवाडी, सुतारवाडी ✻ कुडपगाव - मधलीवाडी, वरचीवाडी, पलीकडची वाडी, मधलीवाडी , मोकास वाडी , टेपकरवाडी , वानवडी , कुंभारवाडी ✻ काजरकोंड - बुदरवाडी, निर्मळवाडी

२,०४,६०४ पेंढ्याच्या जुड्या - २.२५ रुपये प्रती जुडी

**एकूण खर्च - रु. ४,६०,३५९/-**

गवत खरेदी - ✻ दहिवली, आगवे, कोसबी, मुंढे, सावर्डे,ओंबळी

३४१६ नग गवताच्या वरंडी - रु. २५/- प्रति वरंड

**एकूण खर्च - रु. ८५, ४००/-**

**पेंढा आणि गवत खरेदीचा एकूण खर्च - रु. ५,४५,७५९/-**



*संस्थेच्या शेतातील भात लावणी*



*संस्थेच्या शेतातील भात कापणी*

## श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट – 'मागेल त्याला काम' योजना

ट्रस्टच्या मागेल त्याला काम योजनेअंतर्गत एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत वेगवेगळ्या गावातील व वाडीतील स्त्रिया व पुरुष यांना श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्टतर्फे रोजगार देण्यात आला.

| गाव | स्त्री/पुरुष मजूर | कामाचे दिवस | रुपये |
|---|---|---|---|
| मांडकी कामगत | ८ स्त्रिया | ४ दिवस | ९,९२०/- |
| गणेशवाडी कामगत | १७ स्त्रिया | ६ दिवस | ३१,६२०/- |
| कुशिवडे कामगत | १६ स्त्रिया | १४ दिवस | ६९,४४०/- |
| उदेगवाडी कामगत | ११ स्त्रिया | १ दिवस | ३४१०/- |
| आबिटगाव कामगत | ७ स्त्रिया | १४ दिवस | ३०,३८०/- |
| गणेशवाडी कामगत | ५ स्त्रिया | ३० दिवस | ६१,५००/- |
| कोंडमळा कामगत | १६ स्त्रिया | १० दिवस | ४९,६००/- |
| | | | **एकूण मजुरी : २,५५,८७०/-** |



*संस्थेच्या शेतातील भाताच्या पेंढ्या बांधणे*



*संस्थेच्या शेतातील भातझोडणी*

# श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट, श्रीक्षेत्र डेरवण

श्री विठ्ठलराव गणेश जोशी तथा श्री दिगंबरदास महाराज, तथा श्रीसहजानंदसरस्वती स्वामी समर्थ महाराज (रत्नागिरी) हे श्रीसंत वहाळकरबुवा आणि श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर यांच्याशी असलेल्या स्नेहसंबंधांमुळे पूर्वी वारंवार सावर्ड्याला भेट देऊन श्रीदेव दत्त मंदिर, सावर्डे येथे काही वेळा वास्तव्यही करत असत. हा स्नेह पूर्णत: आध्यात्मिक पातळीवरचा होता. श्रीवहाळकरबुवा दि. १९.१.१९५१ रोजी समाधिस्थ झाले. त्यांचे समाधिमंदिर श्रीमहाराजांनी (श्रीसहजानंदसरस्वती स्वामी समर्थ महाराज) सावर्डे येथे १९५३ साली उभारून तेथे त्याच वर्षापासून श्रीवहाळकरबुवांची पुण्यतिथी पौष शु. ११, १२ या तिथींना साजरी करण्याला सुरुवात केली. श्रीसीतारामबुवा श्रीवहाळकरबुवांच्या समाधिमंदिरातच राहत असत आणि श्रीमहाराजही १९५३ सालापासून तेथेच राहू लागले. श्रीवहाळकरबुवांच्या नातेवाइकांनी विवाद निर्माण करून ते समाधिमंदिर ताब्यात घेतल्यामुळे श्रीसीतारामबुवांसाठी श्रीमहाराजांनी जवळच डेरवण गावच्या हद्दीत जागा खरेदी करून तेथे त्यांच्यासाठी एक घर, निर्वाहासाठी थोडी शेती अशी व्यवस्था सुरू केली. मात्र ती व्यवस्था पूर्ण होण्याआधीच दि. १८.१.१९६९ या दिवशी श्रीसंत सीतारामबुवांनी देह ठेवला. श्रीसीतारामबुवा आपल्यापरीने तेथे समाजोपयोगी काम करीत होते. त्यांचे समाजसेवेचे काम पुढे सुरू राहावे म्हणून त्यांच्या नावे ट्रस्ट सुरू करण्यात आला हे आपण प्रथम पाहिलेच. परंतु श्रीमहाराजांच्या मनात समाजाचे चित्रच बदलून टाकून बलशाली, वैभवसंपन्न भारत देशासाठी समाजही बलशाली, वैभवसंपन्न, सुसंस्कृत आणि सुसंघटित करावा असे एक भव्य स्वप्न होते.



श्री विठ्ठल गणेश जोशी तथा श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी समर्थ महाराज

आणि त्यासाठी त्यांनी 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट' स्थापन करून डेरवण येथे 'श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट'च्या बरोबरच मोठ्या कामाचा श्रीगणेशा केला. या ट्रस्टने हाती घेतलेले प्रकल्प अधिक मोठे आणि व्यापक स्वरूपाचे आहेत. याच ट्रस्टच्या माध्यमातून शिवसृष्टी, रुग्णालय, इंग्रजी माध्यमाची शाळा, वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग कॉलेज, फिजिओथेरपी महाविद्यालय आणि अनेक पॅरामेडिकल अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. एक भव्य क्रीडासंकुलही उभारण्यात आले आहे. श्रीमहाराजांनी बीजारोपण केलेल्या कार्याचा आता महावृक्ष झाला आहे. त्यातील निवडक कार्याचा हा आढावा पुढे देण्यात येत आहे.




***भक्तश्रेष्ठ क.ल.वालावलकर रुग्णालय आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण***

# श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट – 'मागेल त्याला काम' योजना



श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर ट्रस्टमध्ये काम करणारे स्थानिक कामगार



श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर ट्रस्टमध्ये काम करणाऱ्या स्थानिक कामगार स्त्रिया

कोकणातील बहुतांश शेतकरी आपल्या शेतातून कुटुंबाच्या निर्वाहाएवढे उत्पन्न काढू शकत नाहीत. अशा शेतकऱ्यांना आणि भूमिहीन शेतमजुरांना (स्त्री-पुरुष) वर्षभर रोजगार मिळावा आणि तो कर्जाच्या विळख्यात सापडू नये या उद्देशाने ट्रस्टने श्रीमहाराजांची ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू ठेवली आहे. या योजनेचा लाभ घेणारे बहुतांश शेतीव्यवसायातील असल्याने त्यांना मुख्यत्वेकरून ट्रस्टच्या शेतांवरच काम दिले जाते. त्याचबरोबर आता संस्थेचे रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग कॉलेज, पॅरामेडिकल कोर्सेस, कौशल्य प्रशिक्षण वर्ग, शाळा, क्रीडासंकुल आदी उपक्रमात  सुमारे १०३८ स्त्री-पुरुष कार्यरत आहेत. यामध्ये प्रामुख्याने १०२ अध्यापक, ४६६ विविध कौशल्यप्राप्त आरोग्य कर्मचारी (परिचारिकांसह) आणि ४७० अकुशल कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

| गावांची नावे | कामगार पुरुष व स्त्रिया | रोजगाराचे महिने | रोजगार रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| डेरवणगाव | ०३ स्त्रिया | १८ महिने | ४,६९,८००/- |
| कोंडमळा गाव, कानसेवाडी | १० स्त्रिया | १८ महिने | १९,६६,०००/- |
| सतीचीवाडी, हडकणी | ०८ स्त्रिया | १८ महिने | १२,५२,८००/- |
| आबीटगाव | १२ स्त्रिया | १८ महिने | १४,६१,६००/- |
| डेरवणगाव | २४ स्त्रिया | १८ महिने | ३७,५८,४००/- |
| डेरवणगाव | २४ पुरुष | १८ महिने | ४९,२४,३००/- |
| डहाणू परिसरातील माणसे | २८ पुरुष | १८ महिने | ५७,४५,६००/- |
| **एकूण खर्च –** | | | **रु. १,९५,७८,५००/-** |




भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणारे स्थानिक कामगार



भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणाऱ्या स्थानिक स्त्री-कामगार

# श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट – 'मागेल त्याला काम' योजना



*भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणारे स्थानिक कामगार*




*भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणाऱ्या स्थानिक स्त्रिया*




*भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणारे स्थानिक कामगार*




*भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणारे स्थानिक कामगार*



*भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणाऱ्या स्थानिक स्त्रिया*



*भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणाऱ्या स्थानिक स्त्रिया*

# श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट – 'मागेल त्याला काम' योजना



भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणारे स्थानिक कामगार




भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणाऱ्या स्थानिक स्त्रिया




भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणारे सुरक्षारक्षक




भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात काम करणाऱ्या सुरक्षारक्षक स्थानिक स्त्रिया



भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाच्या उपाहारगृहात काम करणारे स्थानिक कामगार



भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाच्या उपाहारगृहात काम करणाऱ्या स्थानिक स्त्रिया

# भ.क.ल. वालावलकर रुग्णालयातर्फे शेतकऱ्यांसाठी लेप्टोस्पायरोसिस प्रतिबंधक कार्यक्रम 'लेप्टो ड्राइव्ह - सन २०२३'





कोकणात पावसाळ्यात शेतीच्या हंगामात चिखलात लावणी किंवा तत्सम कामे केल्याने शेतकऱ्यांच्या शरीरात लेप्टोचे जंतू प्रवेश करतात आणि मग अंगदुखी, ताप आणि प्लेटलेट्सची कमतरता अशी लक्षणे दिसू लागतात. काही वेळा हा आजार गंभीर स्वरूप धारण करतो आणि रुग्ण अत्यवस्थ होतो. हे टाळण्याकरता वालावलकर रुग्णालयाने डॉक्सीसायक्लिन नामक औषधाचे वाटप एक प्रतिबंधात्मक उपाय म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून सुरू केले आहे आणि त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. म्हणून मग 'लेप्टो ड्राईव्ह' या नावाने हा कार्यक्रम प्रतिवर्षी पावसाळ्यात शेतकऱ्यांकरता राबविला जातो. या मोहिमेत वालावलकर रुरल मेडिकल कॉलेजचा कम्युनिटी मेडिसिन विभाग, ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र- डेरवण, नागरी आरोग्य प्रशिक्षण केंद्र- चिपळूण, कम्युनिटी मेडिसिन विभाग, वालावलकर हॉस्पिटल यांनी खूप महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. कर्मचारी गोळ्यांसोबत पाण्याच्या बाटल्या घेऊन विविध गावातून प्रत्यक्ष शेतात जातात आणि शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांना तेथेच या गोळ्या घेण्यासाठी उद्युक्त करतात. या मोहिमेमुळे लेप्टोला फार मोठ्या प्रमाणावर आळा बसला आहे.

| गावचे नाव | लाभार्थी संख्या | वाटलेल्या गोळ्या | गोळ्यांची किंमत रु. |
|---|---|---|---|
| डेरवण | २३८ | ४७६ | १०२३/- |
| डेरवण, सुतारवाडी | २० | ४० | ८६/- |
| डेरवण, नाईसकरवाडी | ५० | १०० | २१५/- |
| डेरवण, सुतारवाडी (खुर्द) | ३६ | ७२ | १५५/- |
| डेरवण, गणेशवाडी | ८८ | १७६ | ३७९/- |
| डेरवण, चव्हाणवाडी | ५२ | १०४ | २२४/- |
| कोसबी | ४३ | ८६ | १८५/- |
| कुडप | १०६ | २१२ | ४५६/- |
| हडकणी | ७० | १४० | ३०१/- |
| दुर्गवाडी | १६८ | ३३६ | ७२२/- |
| दळवटणे | ४०७ | ८१४ | १७५०/- |
| खांदत, भोईवाडी | २५८ | ५१६ | १११०/- |
| चिपळूण, वडार कॉलनी | ५४ | १०८ | २३२/- |
| भुरणवाडी, खेर्डी | ४३३ | ८६ | १८५/- |
| रामोशी वाडी, मिठागरी मोहल्ला, मुरादपूर | १७४ | ३४८ | ७४८/- |
| शंकरवाडी | १८९ | ३७८ | ८१३/- |
| चिपळूण, कोळेखाजण | १२१ | २४२ | ५२०/- |
| टेरव चिंचघरी | ७७ | १५४ | ३३१/- |
| वहाळ, बुद्धवाडी | १०७ | २१४ | ४६०/- |
| नांदगाव | २६३ | ५२६ | ११३१/- |
| सावर्डे, उदेगवाडी | ११२ | २२४ | ४८२/- |
| एकूण | २६७६ | ५३५२ | ११५०८ |

औषधी गोळ्या रु. ११५०८.०० + औषध वितरणासाठी झालेला कर्मचाऱ्यांचा प्रवासखर्च रु. १५०००.००

**ट्रस्टने केलेला एकूण खर्च : रु.२६,५०८.००**

## श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट – शेतकऱ्यांकडून दूध खरेदी

दुधाला योग्य दर मिळण्याची शाश्वती नसल्याने लोकांमधील गुरे पाळण्याची प्रवृत्ती कमी होत चालली होती. लोकांना गुरे पाळण्यास प्रवृत्त करण्यासाठी ट्रस्टतर्फे गाईचे दूध ४८ रुपये प्रतिलिटर व म्हशीचे दूध ५८ रुपये प्रतिलिटर या दराने शेतकऱ्यांकडून घेण्यात येते. सदर दुधाचे पैसे दूध पुरवण्याऱ्या शेतकऱ्याच्या बँकखात्यात दरमहा जमा करण्यात येतात. हे दूध रुग्णालयाच्या उपाहारगृहात वापरले जाते.

### कालावधी :- ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४

| महिना | गाईचे दूध खरेदी (लिटर) | दर रु. प्रति लिटर | एकूण रक्कम (रुपये) | म्हशीचे दूध खरेदी (लिटर) | दर रु. प्रति लिटर | एकूण रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल-२०२३ | ३७० | ४८ | १७,७६०.०० | २,०९४ | ५८ | १,२१,४५२.०० |
| मे-२०२३ | ४७१ | ४८ | २२,६०८.०० | २,२०९ | ५८ | १,२८,१२२.०० |
| जून-२०२३ | ३२५ | ४८ | १५,६००.०० | १,९०८ | ५८ | १,१०,६६४.०० |
| जुलै-२०२३ | ३३४ | ४८ | १६,०३२.०० | २,१५३ | ५८ | १,२४,८७४.०० |
| ऑगस्ट-२०२३ | ३३२ | ४८ | १५,९३६.०० | २,१७१ | ५८ | १,२५,९१८.०० |
| सप्टेंबर-२०२३ | ४२० | ४८ | २०,१६०.०० | २,३५५ | ५८ | १,३६,५९०.०० |
| ऑक्टोबर-२०२३ | ५३८ | ४८ | २५,८२४.०० | ३,१५३ | ५८ | १,८२,८७४.०० |
| नोव्हेंबर -२०२३ | ८३२ | ४८ | ३९,९३६.०० | २,९४६ | ५८ | १,७०,८६८.०० |
| डिसेंबर-२०२३ | ७०१ | ४८ | ३३,६४८.०० | २,६२० | ५८ | १,५१,९६०.०० |
| जानेवारी -२०२४ | ६६१ | ४८ | ३१,७२८.०० | २,९७८ | ५८ | १,७२,७२४.०० |
| फेब्रुवारी -२०२४ | ४६५ | ४८ | २२,३२०.०० | २,४६० | ५८ | १,४२,६८०.०० |
| मार्च - २०२४ | ३५७ | ४८ | १७,१३६.०० | २,२८८ | ५८ | १,३२,७०४.०० |
| एकूण | ५,८०६ | | २,७०,६६०.०० | २९,३३५ | | १७,०१,४३०.०० |

**शेतकऱ्यांकडून केलेल्या गाई-म्हशींच्या दूध खरेदीचा एकूण खर्च - रु. १९,७२,०९०/-**



*भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाच्या उपाहारगृहात स्थानिक शेतकऱ्यांकडून दूध खरेदी केले जाते*

# श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने केलेली समाजोपयोगी कामे –दि. १ एप्रिल ते ३१ मार्च २०२४



*सामुदायिक वाढदिवस सोहळा*



*अंगणवाडीतील मुलांची आरोग्य तपासणी*

भ.क.ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र गेल्या २५ वर्षांपासून समाजातील आबालवृद्धांपर्यंत वेगवेगळ्या उपक्रमातून पोहोचत असते. त्यामध्ये ० ते ६ वयोगटातील मुलांसाठी वालावलकर सुदामा योजना, वालावलकर लड्डूगोपाल योजना राबविल्या जातात. त्यात रुग्णालयात मुलांचे सामुदायिक वाढदिवस साजरे करणे, आरोग्य तपासण्या, निवासी शिबिरे, लाडू वाटप आदी उपक्रम केले जातात.



*पौष्टिक लाडू आणि त्याचे घटक पदार्थ*

**१. लड्डूगोपाल योजनेअंतर्गत** अंगणवाडीतील मुलांना दर आठवड्याला २१ लाडू म्हणजे दिवसाला ३ लाडू याप्रमाणे मोफत दिले जातात. दर महिन्याला त्यांना रुग्णालयात आणून तपासणी करून त्यांना आवश्यक असलेली औषधेही मोफत दिली जातात. एप्रिल २३ ते मार्च २४ या काळात वालावलकर लड्डू गोपाल योजनेत २०६ अंगणवाड्यांतून ३०४४ मुलांची तपासणी करून त्यातील ७६ अंगणवाडीतील ७१६ कुपोषित मुलांना लाडू दिले. सामुदायिक वाढदिवस ९ एकूण लाभार्थी ३५१, अंगणवाडी मेळावे २४ एकूण लाभार्थी चिपळूण १६० दापोली २०

**२. सुदामा योजने अंतर्गत** लहान मुलांना व त्यांच्या पालकांना ठराविक ३ ते ६ दिवसांच्या कालावधीसाठी रुग्णालयात आणून त्यांची बालरोगतज्ज्ञांकडून तपासणी व मार्गदर्शन, सकाळी दूध, पौष्टिक लाडू, दोन्ही वेळचे जेवण व औषधे मोफत मिळतात. एप्रिल ते सप्टेंबर महिन्यात एकूण शिबिरे २३ आणि एकूण १८७४ लाभार्थींनी लाभ घेतला. सामूहिक वाढदिवस ४ – एकूण लाभार्थी १५३, अंगणवाडी मेळावे २४ – एकूण लाभार्थी चिपळूणचे १६० व दापोलीचे २० यांनी भाग घेतला.

**३. सुकन्या योजने अंतर्गत** किशोरवयीन मुलींची शाळेमधून हिमोग्लोबिनची तपासणी केली जाते. मार्गदर्शन केले जाते, १



*कुपोषित मुलांसाठी मोफत शिबिर*



*कुपोषित मुलांसाठी पौष्टिक लाडू वाटप*

# श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने केलेली समाजोपयोगी कामे



*किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी*



*सुदामा योजनेअंतर्गत बालकांची रुग्णालयात आणून आरोग्य तपासणी*

दिवसाची कार्यशाळा व ३ ते ५ दिवसांच्या निवासी शिबिरासाठी रुग्णालयात आणले जाते आणि या शिबिरासाठी साधारण २५ ते ३० मुलींना आणले जाते रुग्णालयात आणल्यावर त्यांच्या सर्व तपासण्या - डोळे, नाक, कान, घसा, दंतचिकित्सा, रक्ताची तपासणी इ. स्त्रीरोगतज्ज्ञ करतात. मोटीवेशनल मूव्ही, आपल्याकडे असलेल्या विविध खेळाचे विभाग दाखवले जातात. करिअर गाइडन्स, रोज सकाळी योगासने, विविध सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविले जातात. संपूर्ण दिवस वेगवेगळ्या माध्यमातून त्यांचा शारीरिक व मानसिक विकास होईल यावर जास्तीत जास्त भर दिला जातो. शिबिरात आलेल्या सुरुवातीला लाजणाऱ्या मुली शेवटच्या दिवशी जेव्हा त्यांचं मनोगत व्यक्त करतात त्या वेळी त्यांच्यामध्ये आलेला आत्मविश्वास हा एक चांगला अनुभव असतो. पुढील आयुष्यात कोणते शिक्षण घ्यायचे, आपलं करिअर कसं घडेल इथपर्यंत निर्णय घेण्याची तयारी झालेली असते. जून आणि ऑगस्ट महिन्यात २ निवासी शिबिरे झाली. त्यात लांजा तालुक्यातील २४ मुली, दहिवली गावातील २९ मुली आणि त्यांच्या पालकांनी भाग घेतला.

**४. यशोदा योजने अंतर्गत** गावागावात जाऊन गरोदर मातांची तपासणी केली जाते. वजन, उच्च रक्तदाब तपासला जातो आणि पौष्टिक लाडू देण्यात येतात. दर महिन्याला रुग्णालयात आणून डोहाळेजेवण, स्त्रीरोग तज्ज्ञांकडून तपासणी, मार्गदर्शन दिले जाते. सह्याद्री खोऱ्यात वसलेल्या ह्या कोकणात घरे दूरदूर अंतरावर असतात. रुग्णालयाची जवळ सोय नाही अशा परिस्थितीत माता व बाळ सुखरूप राहून बाळंतपण नीट होण्याकरता माहेर योजना सुरू करण्यात आली. या योजनेत गरोदर मुलीला बाळंतपणाकरता माहेरी आणून तिचे कोडकौतुक केले जाते, तसे रुग्णालयात ती कितीही महिने आधी येऊन राहू शकते. काही जोखमीच्या माता असतात तर काहींची परिस्थिती नसते. रुग्णालयात पांघरण्यासाठी ऊबदार पांघरुणेही दिली जातात. स्त्री बाळंत झाल्यावर ते घरी घेऊन जाण्यासाठी दिले जाते. बाळालाही रुग्णालयातर्फे बाळंतविडा दिला जातो. जुन्या चालीरितींमुळे मुलगी झाली तर नाराजीमुळे घरचे लोक बाळ व बाळंतिणीकडे दुर्लक्ष करतात, म्हणून बाळाचे बारसेही रुग्णालय करते.



*किशोरवयीन मुलींसाठी विविध उपक्रम*

# श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने केलेली समाजोपयोगी कामे



रुग्णालयात भोंडला



किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी



देवरुखच्या कॉलेजमध्ये भोंडला



किशोरवयीन मुलींना शिबिरात सहभागी झाल्यावर देण्यात येणारे प्रमाणपत्र



सामुदायिक डोहाळेजेवण



गर्भवती स्त्रियांना आरोग्यविषयक मार्गदर्शन



गर्भवती स्त्रियांना पौष्टिक आहार



सामुदायिक डोहाळेजेवण

# श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने केलेली समाजोपयोगी कामे




*रुग्णालयातील सामुदायिक बारसे सोहळा*

**५. जनरल हेल्थ चेक-अप** या अंतर्गत गावागावात जाऊन सर्व वयातील लोकांची प्राथमिक तपासणी केली जाते. ई.सी.जी, मधुमेह, डोळ्यांची तपासणी अशा तपासण्या करून त्यातून ज्या रुग्णांना काही शस्त्रक्रिया किंवा अन्य काही वेगळ्या तपासण्या करायच्या आहेत, त्यासाठी शिबिरांचे आयोजन करून रुग्णांवर उपचार केले जातात. मोतीबिंदू शस्त्रक्रिया, हाडांवरील शस्त्रक्रिया, वेगवेगळ्या आजारांवर होणाऱ्या शस्त्रक्रिया ह्या अत्यल्पदरात किंवा पूर्णतः मोफत केल्या जातात.

ह्या उपक्रमांतर्गत रामपूर - ४७, दादर - १९१, भुईवाडा - ५१, आजगाव - २०७, उबरले - ९१ या सर्व गावांतून एकूण ५८७ रुग्णांनी एप्रिल २०२३ या महिन्यात लाभ घेतला.

बिरवाडी ७४, पाजपंढरी ७१, दापोली ४३, धोपावे ८९, पेण ४३, अबलोली ७७, पोलादपूर १५१, वैभववाडी ७४, दहालघर ८४, मंडणगड ५८ या सर्व गावांतून एकूण ७६४ रुग्णांनी जून २०२३ या महिन्यात लाभ घेतला.

कुकावने गावात जुलै महिन्यात १००, ऑगस्टमध्ये १८५ तर सप्टेंबरमध्ये पुरये गावात ४६, वीर गावात ११७ अशा एकूण १६३ रुग्णांनी लाभ घेतला.




*मोफत आरोग्य शिबिर*



*मोफत आरोग्य शिबिर*



*मोफत आरोग्य शिबिर*

## श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट - इंग्लिश मिडियम स्कूल

## सामाजिक आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क सवलत सन २०२३-२४

| इयत्ता | एकूण विद्यार्थी संख्या | लाभार्थी विद्यार्थी संख्या | शाळेची फी प्रति विद्यार्थी रु. | शासनाची फी प्रति विद्यार्थी रु. | शाळेने दिलेली प्रति विद्यार्थी रु. | एकूण सवलत रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ४-५=६ | ३X६=७ |
| पहिली | ७७ | २५ | २४,०००/- | १७,६७०/- | ६,३३०/- | १,५८,२५०/- |
| दुसरी | ६१ | १६ | २१,५००/- | १७,६७०/- | ३,८३०/- | ६१,२८०/- |
| तिसरी | ७७ | १७ | २२,१००/- | १७,६७०/- | ४,४३०/- | ७५,३१०/- |
| चौथी | ६८ | १७ | २२,१००/- | १७,६७०/- | ४,४३०/- | ७५,३१०/- |
| पाचवी | ६४ | १५ | २२,७००/- | १७,६७०/- | ५,०३०/- | ७५,४५०/- |
| सहावी | ४९ | १३ | २२,७००/- | १७,६७०/- | ५,०३०/- | ६५,३९०/- |
| सातवी | ६० | १२ | २२,७००/- | १७,६७०/- | ५,०३०/- | ६०,३६०/- |
| आठवी | ६४ | ९ | २४,५००/- | १७,६७०/- | ६,८३०/- | ६१,४७०/- |
| एकूण | ५२० | १२४ | | | | **६,३२,८२०/-** |

# वृक्षारोपण मोहीम


कंदलागवड करताना प्रशालेतील विद्यार्थी


विद्यार्थ्यांनी केलेले वृक्षारोपण

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, सावर्डे प्रशालेत दि. ५ जून रोजी 'पर्यावरण दिन' उत्साहात पार पडला. यानिमित्ताने वृक्षारोपण व कंदमूळ लागवड असे दोन उपक्रम घेण्यात आले. शाळेच्या परिसरातच इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी पपई, पेरू, बदाम, कोकम, सोनचाफा, बेल या रोपांची लागवड केली. रोपं नुसती लावून चालत नाहीत तर ती मायेने जगवावी लागतात, हे कळावे म्हणून ह्या रोपांच्या संगोपनाची जबाबदारीही याच विद्यार्थ्यांवर सुपूर्द करण्यात आली आहे.

नावीन्यपूर्ण उपक्रम म्हणून विद्यार्थ्यांना काटेकणगर या कंदाच्या लागवडीचे प्रशिक्षण देण्यासाठी श्रीक्षेत्र डेरवण येथे नेण्यात आले. कृषितज्ज्ञ डॉ. हसबनीस व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सुरण, काटेकणगर, शेवरकंद, करिंदा, रताळे, घोरकंद या कंदमुळांच्या लागवडीविषयी सांगत असताना कंद कसा लावावा, कुजू नये म्हणून कोणती प्रक्रिया करावी याविषयी माहिती देऊन त्यानंतर विद्यार्थ्यांना शेतात कणगरं लावण्यासाठी दिली. इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी जवळपास ४५० कंदांची लागवड केली. याच वेळी दापोली कोकण कृषी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. सावंत व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शेतीविषयक विविध शैक्षणिक संधी, व्यवसाय याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. यानिमित्ताने मुलांना पर्यावरणात होणारे बदल व एक जबाबदार नागरिक म्हणून निसर्गाप्रती स्वतःची असलेली कर्तव्ये यांची जाणीव होण्यासाठी केलेला हा छोटासा प्रयत्न!


कंद लागवड करताना प्रशालेतील विद्यार्थी




कृषितज्ज्ञ डॉ. हसबनीस विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

# भ.क.ल. वालावलकर रुग्णालयातर्फे गरीब -गरजू रुग्णांना देण्यात आलेल्या सवलती (सन २०१५-१६ ते २०१८-१९)

| | तपशील | वर्ष २०१५-२०१६ एकूण रुपये | वर्ष २०१६-२०१७ एकूण रुपये | वर्ष २०१७-२०१८ एकूण रुपये | वर्ष २०१८-२०१९ एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | नवजात बालकांना बाळंतविडा भेट | ३,८५,१९१/- | ३,७१,३१४/- | ३,०२,२६३/- | ३,५४,५२७/- |
| २ | महात्मा फुले योजनेखाली रुग्णांना ट्रस्टने दिलेली सवलत (सरकारी मदतीव्यतिरिक्त) | २,४०,०८,९५२/- | १,९८,३१,४०५/- | १,८१,९५,५३४/- | १,३४,०८,६०५/- |
| ३ | विविध रुग्णतपासणी- शिबिरांसाठी आलेला खर्च | ३८,५५,८६५/- | ५१,२४,४६९/- | २७,२६,२२६/- | ४९,०३,४४७/- |
| ४ | मुलांसाठी मोफत दंतचिकित्सा | १२,४४,०५०/- | १,५३,९३६/- | १,४७,४२४/- | १,८३,३२०/- |
| ५ | आंतर-रुग्णांना दिलेली सवलत | ३,६९,५०,७००/- | ५,३६,०६,१४६/- | ६,७९,८३ ७७०/- | ६,१२,७४,५९८/- |
| ६ | गरीब रुग्णांना दिलेली सवलत | २४,६५,६६१/- | २६,८१,६६६/- | ३१,६४,५४४/- | ३६,०९,८६१/- |
| ७ | बाह्य-रुग्णांना दिलेली सवलत | १०,७४,६५७/- | ८,३९,४१४/- | १३,२९,३०६/- | २६,५४,८०७/- |
| ८ | गरीब रुग्णांना त्यांच्या औषधांच्या बिलांमध्ये दिलेली सवलत | - | - | - | - |
| ९ | ग्रामीण सबलिकरण आणि सामाजिक आरोग्य (विद्यार्थ्यांसाठी जेवणखाणाचा खर्च) | - | - | - | - |
| १० | ग्रामीण सबलिकरण आणि सामाजिक आरोग्य (अन्य खर्च) | - | - | - | - |
| | **एकूण रुपये** | **६,९९,८५,०७६/-** | **८,२६,०८,३५०/-** | **९,३८,४९,०६७/-** | **८,६३,८९,१६४/-** |

(८) ही योजना सन २०२२-२३पासून सुरू झाली आहे.

(९, १०) ही योजना सन २०२३-२४पासून सुरू झाली आहे.


## भ.क.ल. वालावलकर रुग्णालयातर्फे गरीब -गरजू रुग्णांना देण्यात आलेल्या सवलती

## (सन २०१९-२० ते २०२३-२४)

| | वर्ष २०१९-२०२० एकूण रुपये | वर्ष २०२०-२०२१ एकूण रुपये | वर्ष २०२१-२०२२ एकूण रुपये | वर्ष २०२२-२०२३ एकूण रुपये | वर्ष २०२३-२०२४ एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३,५१,००७ /- | ६,२१,९१७ /- | २,१७,३८७ /- | २,४६,५००/- | ४,६०,८४०/- |
| २ | ४,४८,८४,९६६ /- | ४,००,७८,८००/- | ४,९७,६३,९६२/- | ८,१७,६१,०५४/- | ५,२२,२९,४७९/- |
| ३ | ५८,८३,५९० /- | ६,१०,४६९/- | २७,२०,४६८/- | १३,५५,५१३ /- | ६,४६,७०८/- |
| ४ | ४,४६,०९१/- | - | - | -- | - |
| ५ | ६,३९,७०,३४८/- | २,४३,१३,०२०/- | ३,४९,८९,४९५/- | २,३८,१६,४५९/- | ५,१८,६०,११५/- |
| ६ | ४०,२५,३०६/- | ३५,९०,६६५/- | ४९,९९,५४२/- | ४२,२६,४३२/- | ७१,९२, ४८८/- |
| ७ | ३९,४२,०१८/- | २९,७४,५४१/- | ३०,०४,७७०/- | ४०,०१,७९५/= | ९६,१४,४५२/- |
| ८ | - | - | - | ५ ९,५९,४८८ | ७६,३३,२१९/- |
| ९ | - | - | - | - | ४,०६,१६२/- |
| १० | - | - | - | - | १,०९,८५९/- |
| | १२,३५,०३,३२५/- | ७,३१,६८,४६१/- | ९,६७,२१,१२२/- | १ ,२४,०४,७३३/- | १३,०१,५३,,३२२/- |

# श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे शास्त्रज्ञ, संशोधकांचा सत्कार






*डॉ. शरदराव राजगुरू* | *डॉ. अरविंद नातू* | *डॉ. श्रीपाद बाणावली* | *डॉ. ऋता मुल्हेरकर*

श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती तथा रावसाहेब बाबामहाराज सहस्रबुद्धे यांच्या जयंत्युत्सवाच्या निमित्ताने श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे विविध शास्त्रज्ञांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र तसेच एक लाख रुपयांचा धनादेश देऊन सत्कार करण्यात येतो, आत्तापर्यंत खालील शास्त्रज्ञांचा सत्कार करण्यात आला.

सन २०१७ – डॉ. शरदराव नरहर राजगुरू
M.Sc., Ph.D.
Retired Joint Director, Deccan College, Pune
Fellow of National Academy of Science, India
Life time Fellow of International Association of Quaternary Studies, Switzerland

सन २०१८ - डॉ. अरविंद नातू
M.Sc., Ph.D.
Winner of Cross Order Merit by President of Germany.
German research ambassador

सन २०१९ – डॉ. श्रीपाद दीनानाथ बाणावली
MD (Med.) Bom, BC Ped., USA
BE Hem Onc, USA
Director (Academics),Tata Memorial Centre Mumbai

सन २०२० – डॉ. ऋता मुल्हेरकर
Ph.D. (Zoology) निवृत्त प्राध्यापिका
ACTREC, Tata memorial Centre, Navi Mumbai

सन २०२१ – डॉ. सतीशचंद्र गोरे
Stitchless spine surgery specialist
M.S. ( Orth), Pune
FABMISS (USA)

सन २०२२ – डॉ. किशोर पाकणीकर
M.Sc Microbiology, University of Pune,
Retired Director, Agharkar Research Institute, (Department of Science and Technology, Government of India) Pune

सन २०२३ – डॉ. आशिष लेले
Director CSIR National Chemical Laboratory Pune
B.Chem. Eng., University of Bombay, Department of Chemical Technology (UDCT )1968
Ph.D. Chem. Engg. University of Delaware, USA 1993
Research Associate, University of Cambridge, UK 2001





*डॉ. सतीशचंद्र गोरे* | *डॉ. किशोर पाकणीकर* | *डॉ. आशिष लेले*

# श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे विद्वानांचा सत्कार







ट्रस्टतर्फे प्रतिवर्षी श्रीबाबामहाराज जयंती उत्सवाच्या निमित्ताने विद्वान शास्त्री आणि विद्वान घनपाठी यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र तसेच ५१ हजार रुपयांचा धनादेश देऊन सत्कार करण्यात येतो. या कार्यक्रमाला या क्षेत्रातले नामवंत विद्वान अध्यक्ष म्हणून बोलवण्यात येतात. त्यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ आणि दहा हजार रुपये देऊन त्यांचा सन्मान करण्यात येतो. सन्माननीय अध्यक्षांच्या हस्ते जयंत्युत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या पाठांतर स्पर्धेतील विजेत्या मुलांना आणि पाठशाळेने घेतलेल्या वैदिक परीक्षांमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली जातात. याच वेळी वैदिक अध्यापनात उत्तम कामगिरी करणाऱ्या पाठशाळेचाही रोख पारितोषिक देऊन सन्मान केला जातो.

**सन २०१६**

विद्वत सत्कार पुरस्कार

१) पंडितप्रवर बी.व्ही. वेंकटरमण, व्याकरण आणि न्यायशास्त्री

२) वे.मू. आनंद सुरेशराव जोशी, शुक्ल यजुर्वेदी घनपाठी

सन्माननीय अध्यक्ष - पंडितप्रवर के.व्ही. रामकृष्णम्माचार्य

**सन २०१७**

विद्वत सत्कार पुरस्कार

१) आचार्य गणेश्वर झा, वाराणसी, उत्तर प्रदेश

२) वेदमूर्ती चंद्रशेखर द्रविड वाराणसी, उत्तर प्रदेश

सन्माननीय अध्यक्ष - आचार्य दिव्यस्वरूप ब्रह्मचारी वाराणसी, उत्तर प्रदेश

**सन २०१८**

विद्वत सत्कार पुरस्कार

१) वेदमूर्ती श्रीराम घनपाठी, कृष्ण यजुर्वेद, हैदराबाद

२) पंडितप्रवर श्रीहरी धायगुडे (न्याय व वेदांतशास्त्री) तामिळनाडू

सन्माननीय अध्यक्ष - पंडितप्रवर श्रीपाद सुब्रमण्यम, व्याकरण, न्याय व वेदांतशास्त्री, हैदराबाद

**सन २०१९**

विद्वत सत्कार पुरस्कार

१) डॉ. श्री संदीप शर्मा, न्यायशास्त्री, उज्जैन, मध्य प्रदेश

२) वेदमूर्ती नारायण घनपाठी, कृष्ण यजुर्वेद, वाराणसी

सन्माननीय अध्यक्ष - पंडित वेंपती कुटुंब, शास्त्री, साहित्य व वेदांतशास्त्री, दिल्ली









**सन २०२०**

विद्वत सत्कार पुरस्कार

१) वेदमूर्ती दुर्गादास अंबुलगेकर, अथर्ववेदी, पुणे

२) पंडितप्रवर मोहनजी शर्मा, उज्जैन, मध्य प्रदेश

सन्माननीय अध्यक्ष - वेदमूर्ती वसंतराव फडकेगुरुजी, पुणे




**सन २०२२**

विद्वत सत्कार पुरस्कार

१) पंडितप्रवर कुप्पा श्रीगुरु बिल्वेश शर्मा, व्याकरणशास्त्री, वाराणसी

२) वेदमूर्ती अथर्व पटवर्धन, ऋग्वेद घनपाठी, पुणे

सन्माननीय अध्यक्ष - डॉ. मनमोहन उपाध्याय
उपकुलपती, पाणिनी विश्वविद्यालय, उज्जैन, मध्य प्रदेश

**सन २०२१**

विद्वत सत्कार पुरस्कार

१) वेदमूर्ती पंडितप्रवर मुरली कृष्ण, चेन्नई

२) वेदमूर्ती गणेश जोगळेकर, गोकर्ण, कर्नाटक

सन्माननीय अध्यक्ष - पंडितप्रवर प्रा. व्ही. मुरलीधर शर्मा,
कुलगुरू, राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, तिरुपती




**सन २०२३**

विद्वत सत्कार पुरस्कार

१) पंडितप्रवर मधुसूदन शर्मा, न्यायशास्त्री, श्रीरंगम, त्रिची, तामिळनाडू

२) वेदमूर्ती माधव मनोज जोगळेकर, ऋग्वेद घनपाठी, पुणे

सन्माननीय अध्यक्ष - पंडितप्रवर हरेराम त्रिपाठीजी,
कुलगुरू, कवी कुलगुरू कालिदास
संस्कृत युनिव्हर्सिटी, रामटेक, नागपूर




**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले. Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५, सहसंपादक : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035